मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# “सर्वसामान्य नागरिकांना त्रास होता कामा नये; अतिक्रमण कारवाईत दुजाभाव नको” : आयुक्त हर्डीकर

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी शुक्रवारी स्वीकारला.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी शुक्रवारी स्वीकारला. पदभार स्विकारल्यानंतर घेतलेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत त्यांनी शहरातील शिस्त आणि प्रशासनातील जबाबदारी यावर भर दिला.

हर्डीकर म्हणाले, “पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिक, गोरगरिबांना कोणताही त्रास होता कामा नये.

पदपथावर उभी केलेली वाहने, मोटारी अगोदर उचलाव्यात, त्यानंतरच फेरीवाल्यांच्या हातगाड्यांवर कारवाई करावी. अतिक्रमण कारवाईत कोणताही दुजाभाव होता कामा नये.” तसेच त्यांनी रस्ते आणि पदपथांवर कचरा साचू नये, जिथे कचरा दिसेल तेथील संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशा सूचना दिल्या.

“पाणीपुरवठा विस्कळीत होऊ देऊ नका. नागरिकांना पुरेसा आणि स्वच्छ पाणीपुरवठा मिळाला पाहिजे. नवीन प्रकल्प आणू नयेत,” असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम आणि आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे उपस्थित होते.

दरम्यान, आयुक्त शेखर सिंह यांच्या बदलीनंतर हर्डीकर यांच्याकडे तात्पुरता कार्यभार सोपविण्यात आला असला तरी, पिंपरी-चिंचवडला नवे आयुक्त म्हणून नागपूरचे जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांच्या नावाची चर्चा सुरू आहे

# सह शहर अभियंता देवन्ना गट्टुवार, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्यासह 36 जणांना ‘गुणवंत अधिकारी/कर्मचारी पुरस्कार...

## उपायुक्त अण्णा बोदडे यांच्यासह 36 जणांना ‘गुणवंत अधिकारी/कर्मचारी पुरस्कार...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेची खरी ताकद म्हणजे येथील अधिकारी आणि कर्मचारी आहेत. प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करणाऱ्या प्रत्येक गुणवंत कर्मचाऱ्याचा सन्मान हा संपूर्ण संस्थेचा सन्मान आहे. सेवाभाव, कार्यतत्परता आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोन या गुणांमुळेच पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त सह शहर अभियंता देवन्ना गट्टुवार, उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे यांच्यासह ३६ जणांना ‘गुणवंत अधिकारी/कर्मचारी पुरस्कार’ अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. महापालिकेच्या सेवेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हे पुरस्कार देण्यात आले.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता मनोज सेठीया, उपायुक्त पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक हे व्यासपीठावर उपस्थित होते. पुरस्कारार्थींच्या वतीने उपायुक्त अण्णा बोदडे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ‘महापालिकेतील सहकाऱ्यांच्या टीमवर्कमुळे आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळेच ही कामगिरी शक्य झाली. या सन्मानामुळे पुढील काळातही अधिक उत्साहाने, पारदर्शकतेने आणि जनहिताच्या भावनेने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.’



### पुरस्कारप्राप्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे...

» देवन्ना गट्टुवार (सह शहर अभियंता), अण्णा बोदडे (उपायुक्त), डॉ.किशोरी नलवडे (सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी), सत्वशील शितोळे (उप अभियंता), विजय कांबळे (उप अभियंता), ज्ञानेश्वर ढवळे (प्रशासन अधिकारी), सुधीर मरळ (कार्यालय अधिक्षक), किशोर काटे (कार्यालय अधिक्षक), विद्या किनेकर (फार्मासिस्ट), सचिन लोणे (कनिष्ठ अभियंता), सुनिल पोटे (प्रयोगशाळा सहाय्यक), गौतम इंगवले (उप अग्निशमन अधिकारी), अनंत चुटके (कॉम्प्युटर ऑपरेटर), श्रीनिवास बेलसरे (मुख्य लिपिक), नंदकुमार शिखरे (वाहनचालक), सज्जाद शेख (वाहनचालक), शरद देवकर (मेंटेनन्स हेल्पर), बापूराव कांबळे (शिपाई), लक्ष्मण मानमोडे (मजूर), किशोर आवटे (शिपाई), शंकर तांदळे (वॉर्ड बॉय), मदन फंड (मजूर), बाबुराव कायंदे (रखवालदार), सुभाष कोकणे (रखवालदार), दिपक रसाळ (वॉर्ड बॉय), सुलोचना गवारी (वॉर्ड आया), सुधाकर गरूड (मजूर), कुंडलिक कुटे (शिपाई), संजय वडमारे (सफाई कामगार), आत्माराम ठाकुर (आरोग्य मुकादम), भिमा असवले (सफाई कामगार), अमित कोष्टी (स्प्रे कुली), अनंता भालचिम (कचरा कुली), किशोर मकासरे (सफाई कामगार), कमलेश गायकवाड (सफाई कामगार), उमेश जाधव (स्प्रे कुली).

# उपजिल्हाधिकारी रुजू, तहसीलदार पद रिक्तच

## काकडे हे सध्या प्रशासन विभागात उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अनधिकृत बांधकाम विभागातील उपजिल्हाधिकारी पदाची जबाबदारी किरण काकडे यांना सोपविण्यात आली आहे. तर, या विभागातील तहसीलदार पद अद्यापही रिक्त असून आहे. काकडे हे सध्या प्रशासन विभागात उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत. ‘पीएमआरडीए’च्या अनधिकृत बांधकाम विभागात दोन जिल्हाधिकारी आणि दोन तहसीलदार यांच्या अधिकारात कामकाज चालते. जुलैमध्ये या विभागातील उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे व तहसीलदार सचिन म्हस्के यांची बदली झाली होती. त्यामुळे अनधिकृत बांधकाम विभागाचा कारभार केवळ एक उपजिल्हाधिकारी आणि एका तहसीलदारावर सुरू होता. तर, तहसीलदार आशा होळकर यांच्याकडे या विभागाचा अतिरिक्त भार सोपविण्यात आला आहे. दरम्यान, आता काकडे यांच्या जागी शासनाने उपायुक्त म्हणून राजेश माशेरे यांची नियुक्ती केली आहे.

# चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी बुधवारी 'अजितदादांचा जनसंवाद'

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराच्या दोन्ही महापालिका ताब्यात घेण्याचा निर्धार केला आहे.

**चिंचवड| प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराच्या दोन्ही महापालिका ताब्यात घेण्याचा निर्धार केला आहे. गेल्या महिनाभरापासून प्रत्येक विधानसभा मतदारसंघाची गल्लीन गल्ली ते पिंजून काढत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघातील जनसंवाद सभेला मोठी गर्दी झाली आणि त्यांच्या दोन दिवसांच्या कार्यकर्ता गाठीभेटीने भाजपामध्ये




अस्वस्थता निर्माण झाली होती. यापूर्वी २०१७ मध्ये पराभव झाल्याने दोन्ही शहरातून राष्ट्रवादीची सत्ता आली पाहिजेच असा निर्धार अजितदादांनी केला असून त्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. पुणे, पिंपरी नंतर आता चिंचवड विधानसभा मतदारसंघात येत्या १५ ऑक्टोबरला (बुधवार) सकाळी नऊ पासून रहाटणी येथील थोपटे लॉन्स मंगल कार्यालयात जनसंवाद सभा आयोजित केली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराच्या दोन्ही महापालिका ताब्यात घेण्याचा निर्धार केला आहे. महापालिका, राज्य सरकारशी संबंधीत सर्व विभागांच्या कोणत्याही तक्रारी, सुचना अथवा अन्य काम अडले असेल त्यासाठी थेट अजित पवार यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. त्यासाठी व्हॉट्सअॅप लिंकवर क्लिक करून थेट अजितदादांना कळवता येणार आहे.

### जनसंवाद कुठे आणि कधी..?

- » बुधवार, दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५
- » वेळ:- सकाळी ०९ वाजल्यापासून
- » स्थळ:- थोपटे लॉन्स (बॅक्वेट), रहाटणी, पुणे ४११०१७

# मराठवाडा जनविकास संघाकडून पोस्ट ऑफिस व सफाई कर्मचाऱ्यांना दिवाळीचा 'पहिला मान'

## पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, बेसिक पिन्सिपल वेस्ट व्हेंचर कंपनीचे कर्मचाऱ्यांना साड्या, कपडे आणि मिठाईचे वाटप

**पिंपरी | प्रतिनिधी**

समाजसेवेची पंधरा वर्षांची परंपरा जपत मराठवाडा जनविकास संघाने यावर्षीही दिवाळीचा पहिला मान पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सफाई कर्मचारी व आरोग्य सेवक, पोस्ट ऑफिसमधील कर्मचाऱ्यांना दिला. 'आनंदाची दिवाळी, अगोदर कष्टकरी कामगार वर्गाची' असे म्हणत पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, बेसिक पिन्सिपल वेस्ट व्हेंचर कंपनीचे कर्मचाऱ्यांना साड्या, कपडे आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.



पिंपळे गुरव येथे मराठवाडा जनविकास संघाच्या कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला ह.भ.प. बब्रुवाहन वाघ महाराज, मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार , मनोज मोरे, धनाजी येळकर, सूर्यकांत कुरुलकर, वामन भरगंडे, सखाराम वालकोळी, अर्जुन खामकर, किशोर आटरगेकर, बळीराम कातंगळे, सतीश काळे, बालाजी पांचाळ, अनिताताई पांचाळ, राजेश सातपुते, शिवाजीराव घोडके, गोरख पाटील, लक्ष्मण जाधव, दिलीपराव बारडकर, महादेव करडे, सोमनाथ वैद्य, राहुल कांबळे, शाहूराज कदेरे आदी उपस्थित होते.

ह.भ.प. बब्रुवाहन वाघ महाराज म्हणाले, ज्यांच्या हातात झाडू आहे, त्यांच्याच हातात शहराचे आरोग्य आहे. त्यांच्यासाठी दिवाळीचा पहिला मान देणे ही खरी समाजसेवा आहे.

अरुण पवार म्हणाले, कष्टकऱ्यांचे जीवन सन्मानाचे व्हावे, ही आमची तळमळ आहे. समाजाच्या या आधारस्तंभांना आधार देणे ही आपली सामाजिक बांधिलकी आहे.

प्रास्ताविक वामन भरगंडे यांनी केले. त्यांनी गेल्या १५ वर्षांत संघाने केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेत कर्मचाऱ्यांच्या सन्मानाची परंपरा अधोरेखित केली.

आभार सूर्यकांत कुरुलकर यांनी मानले.





# प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलला 'इंडिया के-12 पुरस्कार'

## शैक्षणिक क्षेत्रात पिंपरी-चिंचवडचा गौरव...



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलला "अभिनव अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे" या श्रेणीत 'इंडिया के-१२ पुरस्कार २०२५' ने सन्मानित करण्यात आले आहे. पुणे येथे एल्ड्रॉक इंडिया या नामांकित संस्थेतर्फे आयोजित समारंभात हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान शाळेत राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण यासाठी देण्यात आला. शाळेच्या वतीने हा पुरस्कार मुख्याध्यापिका वृंदा जोशी यांनी कल्याणी नगर, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात स्वीकारला. समारंभात प्रमुख पाहुणे आणि इतर मान्यवरांनी कमला एज्युकेशन सोसायटीच्या कार्याचे कौतुक करत प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल इतर शाळांसाठी एक आदर्श ठरल्याचे मत व्यक्त केले. या पुरस्कारामुळे शाळेची प्रतिष्ठा पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात शैक्षणिक क्षेत्रात आणखी उंचावली असून, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची दिशा अधिक बळकट झाली आहे. या गौरवाबद्दल कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, आणि संचालिका डॉ. तेजल शहा यांनी मुख्याध्यापिका वृंदा जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी सर्वांना भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पुण्यातील पुरंदर विमानतळ परिसरात जमिनी खरेदी करू नका : चंद्रशेखर बावनकुळे

## पुरंदर विमानतळाच्या 90 टक्के जागेचे संपादन झाले आहे तर उर्वरित जमिनीचे संपादन देखील लवकरच पूर्ण होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील बहुचर्चित पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाने चांगलाच वेग घेतला आहे. नवीन मुंबई पाठोपाठ पुरंदर येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विमानतळामुळे या परिसरासह आजुबाजूच्या भागाचा चेहरा मोहरा बदलून जाणार आहे.

'पुरंदर विमानतळाच्या ९० टक्के जागेचे संपादन झाले आहे. तर उर्वरित जमिनीचे संपादन देखील लवकरच पूर्ण होणार आहे. विमानतळ होत असल्याने या भागातील जमिनीच्या किंमती मध्ये मोठी वाढ झाली असून या किंमती अक्षरशः गगनाला भिडल्या आहेत.

या भागात एमआयडीसी होणार असून अनेक कंपन्या येणार असल्याचे सांगत काही दलाल विमानतळाच्या आजुबाजूच्या परिसरात असलेल्या जमिनीचे तुकडे पाडून त्या विकण्याचा प्रयत्न करत आहेत. यावर राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे वक्तव्य केले आहे.



### जमीनमोजणीसाठी खासगी भूमापक

» 'जमिनीच्या मोजणीसाठी दररोज महसूल विभागाकडे येणाऱ्या अर्जांचा निपटारा करण्यासाठी महसूल विभागाने परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे साडेतीन कोटी मोजणीची प्रकरणे वेगाने मार्गी लागणार आहेत. नागरिकांनी अर्ज केल्यानंतर ३० दिवसांत मोजणी करून मिळणार आहे,' असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये भाजपच्या पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. त्या वेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी जमिनीच्या प्रलंबित मोजणीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी खासगी भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच पुरंदर विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात कोठेही घरे आणि उंच इमारती होणार नाहीत, याची विशेष काळजी महसूल विभागाकडून घेतली जात आहे. या भागात तुकडे पाडलेल्या जमिनींच्या खरेदी-विक्रीची नोंद होणार नाही, असे स्पष्ट केले.

प्रस्तावित विमानतळाच्या जवळ जागांच्या खरेदी विक्री करण्याबाबत अनेक जाहिराती केल्या जात आहेत. खोट्या जाहिराती करून दलालांकडून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे.

### आधी मोजणी, मग खरेदीखत

» 'राज्यात 'आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर फेरफार' अशा पद्धतीने जमिनीचे व्यवहार व्हावेत, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. अनेकदा खरेदीखतामध्ये जमिनीचे वर्णन चुकीचे असल्याने किंवा प्रत्यक्ष जागेवर जमीन वेगळीच असल्याने मोठे वाद निर्माण होतात. या नव्या पद्धतीमुळे जमिनीच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता येईल आणि वादविवाद टळतील,' असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात कोठेही घरे आणि उंच इमारती होणार नाहीत, याची विशेष काळजी घेतली जात आहे. तुकडे पाडलेल्या जमिनींच्या खरेदी-विक्रीची नोंद होणार नाही,' त्यामुळे नागरिकांनी सावध व्हावे, फसवणुकीला बळी पडू नये, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले.

बावनकुळे म्हणाले, 'शासकीय भूमापकांची संख्या अपुरी असल्याने मोजणीच्या एका प्रकरणासाठी ९० ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. भूमापकांची संख्या वाढवून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच पद्धतीने राज्यातील जमीनमोजणीची प्रकरणे मार्गी लावण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन मोजणी, वनहक्क दावे मोजणी, नगर भूमापन, मोजणीप्रक्रिया यामुळे आता जलदगतीने पूर्ण होणार आहे.'

मोजणी पूर्ण झाल्यानंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उपअधीक्षक भूमी अभिलेख किंवा नगर भूमापन अधिकारी मोजणीच्या कागदपत्रांची तपासणी करून ते प्रमाणित करणार आहेत. त्यामुळे मोजणीच्या कामात अचूकता, अधिकृतता आणि कायदेशीर प्रमाण कायम राहणार

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत गायत्री इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## शिक्षण विश्व: दोन विद्यार्थ्यांनी पटकाविले "गोल्ड"

**पिंपरी | प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या विभागस्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच पार पडली.



यामध्ये गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विभागस्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. यामध्ये ऋतुराज संतोष आंब्रे व हर्षद वोराराम चौधरी या विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल पटकावले, तसेच या दोघांची राज्य स्तरावर खेळण्यासाठी निवड झाली आहे.

मोहित प्रकाशभाई संगाणी, साहिल पवन ठाकरे, आयुष आलोक सिंग व भक्ति सुधाकर ठोंबरे या विद्यार्थ्यांनी रौप्य पदक प्राप्त केले.त्याचबरोबर कुशल गोविंदराम चौधरी व हर्षद दत्तात्रय शिंदे यांनी कांस्य पदक पटकावले. संस्था अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.त्याचप्रमाणे संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील, सर्व मुख्याध्यापक, सर्व उपमुख्याध्यापक, सर्व पालक व शिक्षक यांनी यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक समाधान माने यांचे कौतुक केले.

# आजच्या कथा उद्याचा भारत घडवतील : खासदार शशी थरूर

## दोन दिवसीय साहित्य महोत्सवाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

एक राष्ट्र, एक निवडणूक, एक पक्ष, एक भाषा ही संकल्पना देशातील विविधतेच्या गाभ्यालाच नाकारणारी आहे. अंतिम सत्य हे आपण आपल्या आतच शोधले पाहिजे. आज आपण ज्या कथा निर्माण करत आहोत, त्या उद्याच्या भारताला आकार देतील, असे मत लोकसभा खासदार आणि संसदीय परराष्ट्र व्यवहार स्थायी समितीचे अध्यक्ष डॉ. शशी थरूर यांनी शनिवारी येथे व्यक्त केले.सिंबायोसिस स्कूल फॉर लिबरल आर्टसतर्फे विमाननगर येथील सिंबायोसिस ईशान्य भवनमध्ये आयोजित दोन दिवसीय साहित्य महोत्सवाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.



अध्यक्षस्थानी सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार होते. यावेळी राजदूत पवन वर्मा, फिक्की फ्लोच्या अध्यक्षा अनिता अग्रवाल, सिंबायोसिसच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, आणि सिंबायोसिस स्कूल फॉर लिबरल आर्ट्सच्या संचालिका डॉ. श्वेता देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, डॉ. विद्या येरवडेकर लिखित २०० मोटिवेशनल मंडेज या पुस्तकाचे प्रकाशन थरूर यांच्या हस्ते झाले.थरूर म्हणाले, आजच्या विश्लेषणाच्या युगात केवळ डेटाच आपल्याला मार्गदर्शन करू शकतो, यावर विश्वास ठेवणे सोपे आहे.

परंतु, डेटाला एका कथानकाची आणि तथ्यांना संदर्भांची गरज असते. सत्य प्रभावीपणे सांगण्याची गरज आहे . म्हणूनच आपण शिक्षण, ग्रंथालये, भाषांतरे आणि अशा महोत्सवांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. आपण आपल्या मुलांना केवळ कोडिंगच नव्हे, तर सर्जनशीलताही शिकवली पाहिजे.

# आरक्षण ठरवणार राजकीय भविष्य ; हवेलीतील इच्छुकांची धडपड सुरु

## जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी प्रभाग रचना अंतिम झाली असून आता सगळ्यांचे लक्ष आरकणाकडे लागले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी प्रभाग रचना अंतिम झाली असून आता सगळ्यांचे लक्ष सोमवारी (दि. 13) ऑक्टोबरकडे लागले आहे. याच दिवशी आरक्षण जाहीर होणार आहे. कुठल्या गट-गणात आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी जाईल, यावरच अनेक इच्छुक उमेदवारांचे राजकीय भविष्य अवलंबून आहे.आरक्षण जाहीर होईपर्यंत इच्छुकांची धडपड सुरू असून, आपल्या प्रभागात हवे तसे आरक्षण पडेल का? या प्रश्नाने अनेकांची झोप उडाली आहे.

राज्यात महायुती सत्तेवर असली तरी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका महायुती एकत्र लढवणार की स्वतंत्र, तसेच महाविकास आघाडीची भूमिका काय असेल याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. आपला मतदारसंघ युतीतील दुसऱ्या पक्षाला मिळाला तर काय? असा प्रश्न उमेदवारांना सतावत आहे.प्रशासनाने नुकतीच अंतिम प्रभाग रचना जाहीर केली आहे.



### राजकीय वार्याची दिशा कोणत्या बाजूने?

» राज्यात महायुती सत्तेवर आणि केंद्रात भाजप असल्याने अनेक इच्छुक उमेदवार त्या पक्षांच्या जवळीक साधताना दिसतात. काही आधीच प्रवेश घेत आहेत, तर काही वार्याची दिशा बघून उडी घेतील, असा अंदाज आहे. प्रभाग रचना आणि आरक्षण जाहीर झाल्यानंतरच उमेदवारांचे समीकरण स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत पारावरच्या राजकीय गप्पांना जोर आला असून हवेली तालुका पुन्हा एकदा निवडणुकीच्या रंगात रंगणार हे निश्चित आहे.

हवेली पंचायत समितीच्या हद्दीत असलेली शेवाळेवाडी, शिवणे, मुंढवा, केशवनगर, साडेसतरा नळी, खडकवासला, न-हे आंबेगाव, धायरी, लोहगाव ही गावे आता पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्याने या भागांचा प्रभागातून वगळण्यात आला आहे. तर फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांना स्वतंत्र नगरपरिषद दर्जा मिळाला आहे.

सन 2017 मधील निवडणुकीत हवेली तालुक्यातून 13 जिल्हा परिषद सदस्य आणि 26 पंचायत समिती सदस्य निवडले गेले होते.

मात्र, महानगरपालिकेची हद्दवाढ झाल्याने आगामी निवडणुकीत ही संख्या कमी होऊन 6 जिल्हा परिषद आणि 12 पंचायत समिती सदस्य इतकी राहणार आहे. 2012 मध्ये हवेली तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला होता. यशवंत सहकारी साखर कारखाना बंद करण्याच्या मुद्द्यावर भाजप-शिवसेनेने प्रचार रंगवला होता आणि बहुतांश जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले. 2017 मध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे गटसंख्या वाढली, पण त्यानंतरच्या हद्दबदलामुळे पुन्हा जागा कमी झाल्या.

### स्थानिक मुद्द्यांची झळ..

» शहरालगत असलेल्या हवेली तालुक्यात नागरीकरण झपाट्याने वाढत असले तरी पायाभूत सुविधा मागे पडल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरावस्था आणि नियोजनाचा अभाव या कारणांनी नागरिक त्रस्त आहेत. ग्रामपंचायतींच्या आर्थिक स्थिती आणि नियोजनक्षम नेतृत्वाच्या अभावामुळे विकासाच्या अनेक योजना कागदावरच अडकल्या आहेत.

निवडणुकांसाठी प्रभाग रचना अंतिम झाली असून आता सगळ्यांचे लक्ष सोमवारी (दि. 13) ऑक्टोबरकडे लागले आहे. याच दिवशी आरक्षण जाहीर होणार आहे. कुठल्या गट-गणात आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी जाईल, यावरच अनेक इच्छुक उमेदवारांचे राजकीय भविष्य अवलंबून आहे.आरक्षण जाहीर होईपर्यंत इच्छुकांची धडपड सुरू असून, आपल्या प्रभागात हवे तसे आरक्षण पडेल का? या प्रश्नाने अनेकांची झोप उडाली आहे.

# शिक्रापूरची कोंडी सोडविण्यासाठी अल्टिमेटम

## नारायणगाव बस स्थानकापासून नारायणगाव उपबाजार समितीपर्यंत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

येथील परिसरात गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडीचा मुद्दा गाजत असताना नुकतेच स्थानिकांनी आक्रमक होऊन ट्रॅफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीच्या माध्यमातून जनआंदोलन केले. यानंतर पोलिसांच्या मध्यस्तीने सर्व विभागाच्या अधिकारी व आंदोलकांची बैठक पार पडली.



पुढील महिनाभरात पुणे अहिल्यानगर महामार्गावरील सर्व रस्ता दुरुस्ती करत वाहतूक कोंडीस कारणीभूत कारणांचे निराकरण करण्याची ग्वाही सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता राहूल कदम यांनी दिली असून पोलिसांनी पुढील आढाव्याची बैठक 10 नोव्हेंबर रोजी घेण्याची घोषणा यावेळी केली. प्रशासनाने वाहतूककोंडी सोडवण्याबाबत लक्ष न घातल्यास व उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ट्राफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

शिक्रापूर येथे ट्रॅफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीच्या आंदोलनानंतर आज पोलिसांच्या मध्यस्तीने एक बैठक पार पडली, यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सरपंच रमेश गडदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता राहूल कदम, शाखा अभियंता रणजीत दाईंगडे, कार्यकारी अभियंता ओमप्रकाश निला, पुणे महानगर विकास प्राधिकरणचे शाखा अभियंता संकेत बडे, गौतम पटेल, विशाल मापारी, एस टी महामंडळ आगारप्रमुख मनीषा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य त्रिनयन कळमकर, मोहिनी मांढरे यांसह ट्रॅफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### एक महिन्याने आम्ही मध्यस्ती नसणार

» शिक्रापूर येथे झालेल्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता राहूल कदम यांनी एका महिन्यात ठरल्यानुसार सर्व रस्ता दुरुस्तीची कामे पूर्ण करुन देण्याची ग्वाही दिली. मात्र यावेळी पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या उपस्थितीत कामे न झाल्यास यावेळी जशी आम्ही मध्यस्थी करुन बैठक करुन घेतली तशी कुठलीही बैठक अथवा मध्यस्ती आम्ही करणार नसल्याचे सांगितले.